# दृष्टान्त

रात्री मज एक स्वप्न पडले
स्वप्नात माझ्या, साई देव आले
प्रसन्न मुद्रेने मज ते म्हणाले,
माग तुला जे मागावयाचे
म्हणालो मी क्षमा कर देवा,
माझे मागणे न कधी संपायचे
हसून देव म्हणाले, तरीहि माग तूज मनीचे
दाटून माझे कंठ आले, काही कळेना, काय मागायचे
मी वदलो, देवा नाही उरली मला दौलतीची आसक्ति
सदा लाभू दे सद्‌बुद्धि अन् चित्ती वसावी तव भक्ति
वृद्धिंगत व्हावी तुझी कृपा आणि भक्ति
दूर सरावे मायाजाल आणि व्हावी पापमुक्ति
नको मजला, मानसन्मान, नको प्रसिद्धी
प्रार्थितो तुजला, सतत व्हावी तव कृपेची वृद्धी
सदा राहू दे मजवर तुझी कृपादृष्टी
भक्तिभावे करतो मी तुजवर पुष्पवृष्टी

**– पद्‌माकर चित्रे**

(‘शब्दांची फुलपाखरे’ या कवितासंग्रहातून)